NAVJYOT / Vol. XIV / Issue – I ISSN 2277-8063

# भारत मालदीव संबंध आणि सद्यस्थिती

आतार आयेशा शफिक संशोधक विद्यार्थिनी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

---

**सारांश**

आंतरराष्ट्रीय संबंधाच्या बाबतीत 21 वे शतक कमालीचे गतिमान शतक आहे. वर्तमान व्यवस्थेत आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताला फार विचार करून आपले निर्णय घ्यावे लागत आहे. भारत आशिया खंडातील लोकसंख्येच्या आकारमानावरून, अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचा देश आहे. तर मालदीव हा अगदी भारतापासून दोन हजार किलोमीटर अंतरावर असलेला एक छोटा पण संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा असणारा देश आहे. आशिया खंडाचे नेतृत्व एक महत्त्वाचा देश किंवा मोठा भाऊ म्हणून जरी भारत प्रतिनिधित्व करीत असले तरी भारताला स्वतःचा विकास करताना आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात आपला पाय रोवून उभे राहण्यासाठी या छोट्या राष्ट्रांचा पाठिंबा अत्यंत महत्त्वाचा आहे.

भारत आणि मालदीवसंबंध सर्वसाधारणपणे 1965 मध्ये ब्रिटन पासून स्वातंत्र्य मिळाल्यापासून मालदीवचे भारताशी संबंध स्थिर राहिलेले आहे. मालदीवची राजकीय स्थिरता भारतासाठी महत्त्वाची आहे. सुरुवातीच्या काही योजनेचा भाग म्हणून भारत मालदीवसंबंध दृढ झाले. त्यानंतर मालदीव मध्ये येणाऱ्या अनेक नव्या सत्तांतरामध्ये भारत मालदीवसंबंध कधी मैत्रीपूर्ण तर कधी तणावपूर्ण निर्माण . काही वेळा चीन भारत आणि अमेरिका यांसारख्या शक्तिशाली राष्ट्रांच्या उपस्थितीमुळे मालदीवला आर्थिक आणि राष्ट्रीय उद्दिष्टे पुढे नेण्यासाठी कठीण निर्णय काळजीपूर्वक घ्यावे लागतात. त्याचबरोबर त्यांचे सार्वभौमत्व ही जपावे लागते.

मालदीवला अचानक उद्भवणाऱ्या कोणत्याही संकटात चीन मदत करू शकत नाही. त्यासाठी त्याला भारताकडेच पाहावे लागणार शिवाय मालदीवची अर्थव्यवस्था भारतावर बऱ्यापैकी अवलंबून आहे. मालदीवला जाणाऱ्या पर्यटकात सर्वाधिक भारतीय पर्यटक असतात. दरवर्षी दोन ते तीन लाख पर्यटक मालदीवला भेट देतात त्यामुळे मालदीवला भारताशी चीनच्या सौहार्दासाठी अकारण शत्रुत्व घेणे परवडणार नाही. भारतातीचे सुरुवातीच्या परराष्ट्रीय धोरणापासून आजपर्यंतच्या परराष्ट्रीय धोरण पाहिल्यास सुरुवातीस भारत मालदीवसंबंध स्थिर आणि काही काळ तणावाचे पहावयास मिळतात. प्रस्तुत शोधनिबंधात भारत मालदिवसंबंधाचा मैत्रीपूर्ण संबंधापासून तणावपूर्ण संबंध आणि सद्यस्थिती याचा अभ्यास या शोध निबंधाचा मुख्य हेतू आहे.

प्रस्तावना

स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच भारताने स्वतःच्या विकासासाठी आपले अलगपण जपण्यासाठी अलिप्ततेचे धोरण स्वीकारले. परराष्ट्र धोरणाबाबतची पंडित नेहरू यांची भूमिका नेहमीच आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्वपूर्ण राहिलेली आहे. स्वातंत्र्यानंतर दोन बलाढ्य गट अमेरिका आणि रशिया या दोन्ही गटात सामील न होता दोहोंशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करून आपला विकास करण्याकडे भारताने नेहमी लक्ष दिलेले आहे. भारताचे असलग्नतेचे तत्व अमेरिकेला स्वतःविरोधी वाटत होते. त्यादरम्यान रशिया हा नेहमी भारताचा विश्वासू मित्र राहिला. तर अमेरिकेने मात्र नेहमीच पाकिस्तानला मदत केलेली दिसते आणि त्याला भारताच्या विरोधात वापरायचे काम केलेले आहे. अलीकडच्या काळात मात्र आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये भारताची भूमिका आणि भारताचे वाढलेले वजन पाहता अमेरिकेला भारताची गरज वाटू लागली आहे. आशिया खंडातील परिस्थिती सुद्धा यापेक्षा वेगळी नाही आज जगात लोकशाही प्रक्रिया राबवणारा भारत हा सर्वात मोठा देश आहे.

भारताचे आंतरराष्ट्रीय संबंध तपासताना दोन प्रवाहतून पाहिले जातात इतर देशांशी असणारे संबंध आणि जवळच्या राष्ट्रांशी असणारे संबंध इतर देशांपेक्षा शेजारील देशांबाबत भारताला फार काळजीपूर्वक निर्णय घ्यावे लागतात. त्यातच भारत-पाक संघर्ष सर्वश्रुत आहे त्यामुळे इतर जवळच्या राष्ट्रांबाबत मतभेद झाल्यास या संघर्षाचे निवारण शांततेच्या मार्गाने करणे हाच जवळचा मार्ग भारताकडे असतो. आपण जेव्हा जागतिक सुरक्षितता व शांततेचा आढावा घेतो तेव्हा विकसनशील राष्ट्रात अंतर्गत प्रश्नामुळे बरीच राष्ट्रीय होरपळून निघत आहेत असे दिसते.

कोणत्याही देशाला आंतरराष्ट्रीय राजकारणात आपली पकड घट्ट करायची असेल तर शेजारील देशांशी मैत्रीपूर्ण संबंध विकसित करावे लागतात. आणि ते कायमस्वरूपी टिकवावे लागतात. त्याचा फायदा आंतरराष्ट्रीय राजकारणात आपल्या कृतीला पाठिंबा मिळवण्यासाठी होतो. याच पार्श्वभूमीवर भारत मालदीव संबंध आणि सद्यस्थिती याचा अभ्यास या शोधनिबंधात करण्यात येणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1 भारत मालदीवसंबंधाचा अभ्यास करणे

2 मालदीवचे चीन सोबत वाढलेले संबंध आणि त्याचा भारतावर होणारा परिणाम याचा अभ्यास करणे.

3 भारताने परराष्ट्र धोरण आखताना मालदीव सोबत सहकार्य मैत्रीत्व यांना प्राधान्य देणे

*** भारत मालदीवसंबंधाची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी** :

भारत आणि मालदीवमध्ये प्राचीन काळापासून वांशिक, भाषिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि व्यावसायिक संबंध आहेत. १९६५ मध्ये स्वातंत्र्यानंतर मालदीवला मान्यता देणाऱ्या आणि त्या देशाशी राजनैतिक संबंध प्रस्थापित करणाऱ्या भारतापैकी भारत पहिला देश होता.मालदीवची भारताच्या पश्चिम किनाऱ्याशी जवळीक (मिनिकॉयपासून केवळ ७० नॉटिकल मैल अंतरावर आणि भारताच्या पश्चिम किनाऱ्यापासून केवळ ३०० नॉटिकल मैल अंतरावर) आणि हिंद महासागरातून जाणाऱ्या व्यावसायिक सागरी मार्गांच्या केंद्रस्थानी असलेली त्याची स्थिती (विशेषतः ८° उत्तर आणि १½° उत्तर वाहिन्या) भारतासाठी महत्त्वपूर्ण धोरणात्मक महत्त्व दर्शवते. भारताच्या "नेबरहूड फर्स्ट" परराष्ट्र धोरणांतर्गत मालदीवला एक विशेष स्थान आहे. ज्याचा उद्देश हिंद महासागर प्रदेशात (IOR) स्थिरता आणि समृद्धी आणणे आहे. तसेच, दोन्ही राष्ट्रे IOR ची सुरक्षा आणि सुरक्षा राखण्यात प्रमुख खेळाडू आहेत, अशा प्रकारे भारताच्या नेतृत्वाखालील सुरक्षा आणि विकास सर्वांसाठी (SAGAR) दृष्टिकोनात योगदान देतात.

भारत मालदीव संबंध :

सुरुवातीपासूनच भारत मालदीवसंबंध मैत्रीपूर्ण आहेत कोलंबो योजनेचा भाग म्हणून अनेक मालदीवचे विद्यार्थी भारतात शिकण्यासाठी येत आहे. त्यामुळे भारत आणि मालदीव मधील मैत्री अधिक दृढ झाली. मालदीवची राजधानी माले येथे 1974 मध्ये स्टेट बँक ऑफ इंडियाची शाखा उघडली गेली. आणि 1975 मध्ये हवाई सेवा सुरू झाली. याशिवाय मालदीव मध्ये भारताने अनेक तांत्रिक सहाय्य केलेले आहे. मिनीकॉय बेटामुळे अनेक मतभेद झाल्यानंतर मालदीवने स्पष्ट केले की ते केवळ सांस्कृतिक साम्य यावर चर्चा करत आहे राजकीय दावा करत नाही.

1978 मध्ये मौमून अब्दुल गयूम राष्ट्रपती म्हणून पदभार स्वीकारल्यापासून मालदीव मधील राजकीय परिस्थिती लक्षणीय रित्या उलथापालथ झालेली आहे. त्यांच्या अध्यक्षपदाच्या काळात मालदीवचे भारतासोबत परराष्ट्र धोरण अस्पष्ट होते. 1988 मध्ये ऑपरेशन कॅक्टसचे नेतृत्व करून भारताने गयूम यांच्या नेतृत्वाचे रक्षण करण्यासाठी मदत केली. परदेशी मित्राच्या शोधात गयूम यांनी चीनच्या पारड्याला कौल दिला. जो हिंद महासागरात महत्वपूर्ण धोरणात्मक हितसंबंधात विकसनशील महासत्ता आहे. मालदीव चीन भागीदारी मजबूत करण्यासाठी गयूमने चीनला दोन दौरे केले पहिला 1984 मध्ये दुसरा 2006 मध्ये महत्त्वाच्या देशांमध्ये धोरणात्मक दृष्ट्या आपले हितसंबंध पुढे नेण्यासाठी पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांचा वापर करण्याचा चीनच्या खेळीला मालदीव सुद्धा बळी पडला. चिनी कंपन्यांनी मालदीव प्रकल्प कंत्राटी उद्योगात प्रवेश केला. मालदीवच्या कामकाजासाठी दरवर्षी निधी दिल्याने चीन आणि मालदीव मधील मैत्री घट्ट झाली आणि भारतासोबत सौहार्दपूर्ण संबंध असूनही मालदीवने चीनच्या दिशेने पावले टाकली त्यामुळे भारत मालदीव संबंधावर परिणाम झाले.

2008 मध्ये झालेल्या पहिल्या बहुध्रुवी बहुपक्षीय निवडणुकांमध्ये चीन मालदीव द्विपक्षीय संबंधांमध्ये अस्थिरता निर्माण झाली आणि मोहम्मद नशीद यांच्या नेतृत्वाखाली मालदीवचे पहिले लोकशाही प्रशासन उदयास आले. त्यांच्या प्रशासनाने भारत प्रथम हे धोरण स्थापित केले. चीनच्या पायाभूत सुविधांच्या बांधकामासाठी नकार दिला आणि भारतीयांना 26 प्रवाळांवर रडार बसवण्याची परवानगी दिली. भारतीय नौदलासोबत नौदल सरावांचे समन्वय साधले मालदीवच्या राष्ट्रीय संरक्षण दलाला (MNDF ) भारतातून प्रशिक्षण दिले.

2012 मध्ये नाशीद यांच्या जाण्यानंतर उपराष्ट्रपती मोहम्मद वाहिद यांचे नवीन एकता सरकार आल्यावर त्यांचा कालावधी पुन्हा चीनकडे झुकला. आणि भारतापासून दूर झाला भारताने वाहिदला मान्यता दिली तरी त्यांनी चीनशी अधिक जवळीकता साधली ज्यामुळे भारताने अंशताग्रस्त मालदीवला मदत थांबवून त्याचे प्रत्युत्तर दिले. 2013 मध्ये सत्तेवरती आलेल्या अब्दुल्ला यामिन यांना अध्यक्षपदाचा विजेता घोषित करण्यात आले यामीन यांची सुद्धा चीन सोबत जवळीकता असल्यामुळे 2014 मध्ये चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी मालदीवला भेट दिली. व द्विपक्षीय संबंधांमध्ये मोठे बदल झाले चीनची वाढती जवळीकता सहभाग प्रतिप्रक्रियेत भारत सरकारने मालदीवच्या संप्रेषण उपग्रहाच्या सहकारी बांधकाम प्रक्षेपण आणि ऑपरेशनमध्ये भारतीय अंतराळ संशोधन संस्थेला एकात्मिक केले. ऑक्टोंबर 2015 मध्ये भारतीय परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांनी मालदीवला भेट दिली. आणि द्विपक्षीय संबंध सुधारण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला हा या दौऱ्यामधील महत्त्वाचा टप्पा होता.

2018 मध्ये मोहम्मद इब्राहिम सोलीह निवडून आल्यानंतर परिस्थिती अमुलाग्र बदलली. लोकशाही परत आली आणि भारत व मालदीव संबंध पुन्हा निर्माण झाले. बीजिंग सोबतच्या व्यापार करारातून बाहेर पडून मोहम्मद इब्राहिम सोलिह यांनी त्यांची इंडिया फर्स्ट रणनीती प्रत्यक्षात आणली. ज्यामुळे भारत आणि मालदीव मधील विविध कायदेशीर सहकार्य मजबूत झाले. भारताने मालदीवला सामुदायिक विकासासाठी पूरक निधी दिला माले कनेक्टिव्हिटी प्रकल्प सार्वजनिक उद्यानासाठी बांधकाम साहित्याची तरतूद आणि राजधानी मालेला प्रादेशिक आणि औद्योगिक बेटांशी जोडणारे पूल बांधणे यांसारख्या अनेक विकास प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी भारताने मदत केली. इब्राहिम सोलीह यांच्या काळात भारत मालदीव संबंध समृद्ध झाले.

***भारत मालदीवसंबंध आणि सद्यस्थिती**

ऑक्टोंबर 2023 मध्ये मोहम्मद मोईझू यांनी पीपल्स नॅशनल काँग्रेस पक्षातून मालदीवचे अध्यक्ष म्हणून कार्यभार स्वीकारला. इंडिया आऊट या घोषणेवरच त्यांनी ही निवडणूक लढवली आणि ते निवडून आले. सत्तेवरती येताच त्यांनी भारताच्या विरोधात पावले उचलावयास सुरुवात केली. त्यामध्ये मालदीवच्या सागरी सर्वेक्षणाचा भारताबरोबरचा असलेला करार जूनमध्ये संपल्यानंतर तो पुन्हा पुनरुज्जीवत न करण्याची घोषणा केली. मालदीवचे नवनिर्वाचित अध्यक्ष त्यांचा पहिला अधिकृत परदेश ही दौरा भारताला भेट देऊन करीत ही प्रथा मोडून मोईझू यांनी पहिला दौरा तुर्कस्तानचा केला व पहिला अधिकृत राजकीय दौरा चीनचा केला. त्यात त्यांनी चीन सोबत वीस करार केले. ज्यात मुक्त व्यापाराचा करार आणि चीनच्या बेल्ट अँड रोड प्रकल्पात सहभागी होण्याचा करार समाविष्ट आहे. याचाच अर्थ मालदीव यांनी भारताला बाजूला केल्याचे चित्र स्पष्ट दिसते.

मालदीवसारख्या छोटे राष्ट्र असणाऱ्या देशाने मोदींसारख्या मात्तबर नेत्याला आव्हान देणे अगदी चकित करणारे आहे. "आम्ही छोटा देश असल्यामुळे कोणीही आम्हाला धाकदपटशा दाखवू नये तो आम्ही सहन करणार नाही" अशा स्वरूपाचे मोईझू यांनी वक्तव्य केले आणि भारत व मालदीव मधील तणाव वाढला मोईझू आणि मोदी यांची भेट कॉप 24 परिषदेच्या निमित्ताने झाली. पण त्याचा फारसा प्रभाव पडला नाही मालदीवच्या संसदेत भारताचे मित्र असलेल्या मालदीव डेमोक्रॅटिक पार्टीचे बहुमत आहे. या पक्षाकडे 87 पैकी 65 जागा आहेत. या पक्षाने भारताशी अशा व्यवहारावर मोईझू यांच्यावर महाभियोग दाखल करण्याचा इशारा दिला आहे. पण मोईझू यांच्यावर काय परिणाम होईल असे वाटत नाही.

- **मालदीवचे भारतासोबत सलोख्याचे संबंध असणे का महत्त्वाचे आहे?**

मालदीव हे एक स्वतंत्र राष्ट्र आहे त्याला त्याची धोरणे आखण्याचा अधिकार आहे. पण हा सिद्धांत व्यवहारात मात्र लागू होत नाही. मोठया देशांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला की बलाढ्य राष्ट्र वेगळ्या मार्गाने त्या देशाची नाचक्की करतात. उदा. राजीव गांधी सरकारने नेपाळ व भारतातील व्यापारी दळणवळणासाठी असलेले अनेक मार्ग बंद करून आंतरराष्ट्रीय कायद्याअंतर्गत आवश्यक असतील तेवढाच मार्ग खुले ठेवले होते. त्यामुळे नेपाळमध्ये इंधन खाद्यपदार्थ व अन्य सामानाची टंचाई निर्माण झाली होती शेवटी नेपाळला भारताविरोधी धोरणे मागे घ्यावी लागली होती.

मालदीवने कितीही भारता विरोधी भूमिका घेतल्या तरी मालदीवचा प्रमुख व्यवसाय पर्यटन आहे. त्यांची अर्थव्यवस्था बऱ्यापैकी भारतावर अवलंबून आहे. मालदीवच्या एकूण पर्यटनात भारतीयांचा वाटा 14 ते 22 टक्के इतका आहे भारताच्या नेबर फर्स्ट धोरणाचा सर्वाधिक फायदा मालदीवला मिळत असतो. त्यामुळे भारताशी अकारण शत्रुत्व घेणे मालदीवला परवडणारे नाही. शिवाय चीन छोट्या राष्ट्रांना कर्जाच्या माध्यमातून गिळंकृत करतो. त्याचा हा आत्तापर्यंतचा इतिहास आहे हेही मालदीवला अडचणीत आणणारे आहे. भारत व मालदीव संबंध बिघाड हा चीनच्या प्रभावाने झाला आहे हे उघड सत्य आहे.

***भारताने कोणती पावले उचलण्याची गरज आहे?**

महासत्तेकडे वाटचाल असणाऱ्या भारताला अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात आपली जागा टिकून ठेवण्यासाठी भारताने जाहीरपणे इतर देशांच्या विरोधात बोलणे टाळले पाहिजे. स्वतःची औद्योगिक शक्ती वाढवली पाहिजे. मालदीव आणि इतर सर्व शेजारील राष्ट्रांमधील आपली भूमिका चांगली करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. युनो मधील प्रतिनिधित्वासाठी लहान राष्ट्राच जर आपल्या बाजूने नसतील तर आपल्या भूमिकांवर नेहमी प्रश्नचिन्ह निर्माण होतील भारताचे प्रमुख शत्रू पाकिस्तान आणि चीन यांच्या कुरघोड्यांना प्रतिबंध घालण्यासाठी इतर शेजाऱ्यांशी आपले संबंध स्नेहपूर्ण असावेत याची भारताला नितांत आवश्यकता आहे.

- **निष्कर्ष**

1 भारत मालदीवसंबंध सुरुवातीपासूनच मैत्रीपूर्ण असलेले दिसतात.
2 दोन्ही देशांकडून व्यापार आणि सहकार्याच्या बाबतीत चांगली पावले उचलली गेली आहे.
3 भारताने नेहमीच मालदीवला सहकार्य करून मोठ्या भावाची भूमिका बजावलेली आहे.
4 चीनच्या वाढत्या प्रभावामुळे भारत मालदीवसंबंधांमध्ये दुरावा निर्माण झाला आहे.
5 हिंद महासागर प्रदेशात स्थिरता आणि समृद्धी आणण्यासाठी भारताला नेहमीच मालदीव एक चांगला मित्र म्हणून गरजेचा आहे.
6 मालदीव बरोबर संबंध सुधारण्यासाठी भारत व मालदीव या दोन्ही देशांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

- **संदर्भ**

1 सिकरी राजीव 2017 भारताच्या परराष्ट्र धोरणाचा पुनर्विचार आवाहने आणि नीती
2 लेख साधना साप्ताहिक फेब्रुवारी 2024
3 डॉ. खरे विजय 2008 जागतिक राजकारणात भारत